**डॉ.रामास्वामी एन., सचिव (पदुम) यांचा केंद्र शासनाचे मत्स्यपालन (AFD) विभागामार्फत २९ जून २०२६ ते ०३ जुलै २०२६ या कालावधीत प्रस्तावित शिष्टमंडळाचा फ्रान्स येथे आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरा.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः दौरा-२०२६/प्र.क्र.१८२/पदुम-१४ (ई-१७०१७३९)**
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०००३२
दिनांक: २२ जून, २०२६

**वाचा :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परदौ-१४२०/प्र.क्र.२६/११, दि.०१.०२.२०२१.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परदौ-१४२५/प्र.क्र.९५/विचौ-१, दि.२१.०८.२०२५.

३) Ministry of Animal Husbandry, Dairying and Fisheries, Department of Fisheries, GoI, New Delhi Letter No.J-14001/29/2026/Fy (E-27909), Dated 30.04.2026

**प्रस्तावना :-**

दि.१६ फेब्रुवारी, २०२६ रोजी केंद्र शासनाचे मत्स्यव्यवसाय विभाग आणि Agence Francaise de Developpement (French Development Agency) (AFD) यांच्यामध्ये for the technical project on “Indo-French Technical Cooperation for Blue Transformation of Fishing Harbors for Sustainable Fisheries Development” या प्रकल्पासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. या "प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या पद्धती आणि उपक्रम" या सामंजस्य कराराच्या तरतुदींनुसार, तांत्रिक भागीदार कार्यशाळा, समवयस्क देवाण-घेवाण, भारतांतर्गत तथ्य-शोध मोहीम आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे (फ्रान्स आणि तात्पुरते इंडोनेशिया येथे) आयोजन प्रस्तावित आहे.

२. त्यानुषंगाने, केंद्र शासनाचे मत्स्यपालन विभागाने दि.२९ जून २०२६ ते ०३ जुलै २०२६ या कालावधीत (प्रवासाचा कालावधी वगळून) फ्रान्सच्या अभ्यास दौऱ्याचा प्रस्ताव दिला आहे. प्रस्तावित शिष्टमंडळात परराष्ट्र विभागाचे अधिकारी आणि संबंधित मासेमारी बंदर किंवा पोर्ट प्राधिकरणांचे तांत्रिक प्रतिनिधी यांचा समावेश असावा. 'ब्लू पोर्ट' संकल्पनेनुसार मासेमारी

बंदरे आणि पोट्र्सचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, तसेच, संबंधित राज्यात अशाच प्रकारच्या प्रारूपांची अंमलबजावणी करणे, हा या दौऱ्याचा उद्देश आहे. सदर फ्रान्स येथे नियोजित असलेल्या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी, एका वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्याचे, प्राधान्याने सचिव (एडीएफ), यांचे नामनिर्देशन करणेबाबत, सहाय्यक आयुक्त (मत्स्य), मत्स्यपालन, पशुपालन व डेयरी मंत्रालय, मत्स्य पालन विभाग, नवी दिल्ली यांनी वाचा-३ येथील दि.३०.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच, सदर दौ-याचा सर्व खर्च आयोजक म्हणजेच Agence Francaise de Developpement (French Development Agency) (AFD) उचलणार असल्याने, याचा महाराष्ट्र शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व राहणार नाही, असे देखील नमूद केले आहे.

३. त्यानुषंगाने, केंद्र शासनाचे मत्स्यपालन विभागाने कळविल्यानुसार, दि.२७ जून, २०२६ ते ०४ जुलै, २०२६ (प्रवास कालावधीसह) या कालावधीमध्ये फ्रान्स येथील अभ्यास दौऱ्याकरिता प्रस्तावित शिष्टमंडळात डॉ.रामास्वामी, एन. सचिव (पदुम) यांचे नाव नामनिर्देशित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

केंद्र शासनाचे मत्स्यपालन विभागाने कळविल्यानुसार दि.२७ जून, २०२६ ते ०४ जुलै, २०२६ (प्रवास कालावधीसह) या कालावधीत फ्रान्स येथील अभ्यास दौऱ्याकरिता प्रस्तावित शिष्टमंडळात डॉ.रामास्वामी, एन. सचिव (पदुम) यांचे नाव नामनिर्देशित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर परदेश दौऱ्याचा संपूर्ण कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात यावा.

३. या अभ्यास दौऱ्यासाठी जाण्या-येण्याचा विमान प्रवास, Visa खर्च तसेच, तेथील निवास खर्च, इ. खर्च हा Agence Francaise de Developpement (French Development Agency) या संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

४. संबंधित अधिकारी यांचा वैद्यकीय विमा काढण्यात यावा. तसेच, कोविड सारखी संसर्गजन्य आजाराची परिस्थिती उद्भवल्यास योग्य ते वैद्यकीय उपचार मिळतील याची दक्षता घ्यावी.

५. सदर कार्यक्रमाबाबतचा परदेश दौरा पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यानी त्यांच्या विदेश दौऱ्यासंबंधिचा विस्तृत अहवाल संबंधित प्रशासकीय विभागास आणि सामान्य प्रशासन विभागास सादर करावा. तसेच, विदेश दौऱ्यात प्राप्त केलेल्या ज्ञानाचा/कौशल्याचा उपयोग अन्य अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी करावा.

६. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.६७/२०२६, दि.१२.०६.२०२६ अन्वये दिलेली मान्यता तसेच, Ministry of Animal Husbandry, Dairying and Fisheries, Department of Fisheries, GoI, New Delhi Letter No.J-१४००१/ २९/ २०२६/Fy (E-२७९०९), Dated ३०.०४.२०२६ प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६२२१३२२१६०९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.06.22 13:25:56 +05'30'

**(किशोर जकाते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा)-१/२, मुंबई/नागपूर.
२) मा .मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्याक) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय.
५) मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय व बंदरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) डॉ.रामास्वामी एन., सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) Assistant Commissioner (Fisheries), Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairying, Department of Fisheries, New Delhi.
११) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६) सर्व कार्यासने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय
१७) निवडनस्ती (१४-पदुम)